नियमीत फौ. ख.क्र.१३९/२०१५
सरकार विरुध्द निवृत्ती वगैरे
निशाणी क्र.३६

## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र (०४) यांची जबानी.

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नांवः– सुधाकर दिनकर खेडकर,
वय सुमारेः– ५६ वर्षे, व्यवसायः– शेती
निवासस्थानः– मुंगूसवाडे ता. पाथर्डी जि. अहमदनगर

## सर तपासणी

## अभियोग पक्षाकरिता श्रीमती ए. बी. कुलकर्णी, सहाय्यक सरकारी अभियोक्ता.

फिर्यादी ही माझी चुलती असल्याने मी तिला ओळखतो. आरोपी हे माझे गावातील असल्याने त्यांना देखिल मी ओळखतो. घटना कधी, कोठेव काय घडली होती हे मला माहित नाही. असे काही घडले नाही की, दि. १८.०७.२०१४ रोजी मी शेतामध्ये काम करत असताना फिर्यादीच्या शेतात आरोपी आले व त्यांनी फिर्यादीसोबत वाद घालू लागले व आरोपी निवृत्ती हा फिर्यादीस हिच्या गांडीत मिरची टाका, तसेच तीला खाली पाडु मी तीला झवतो अशा अश्लील भाषेत शिवीगाळ केली व त्यांनी तिला खाली पाडून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली व मी त्यांना सोडवायला गेलो. पोलिसांनी माझा जबाब नोंदविला होता.

(साक्षीदार पुर्वीच्या जवाबाप्रमाणे साक्ष देत नसल्यामुळे सरकारी वकीलांनी साक्षीदारास फितूर घोषित करुन उत्तर सूचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. ... सबब ती देण्यात आली.)

## उलट तपासणी – सहाय्यक सरकारी अभियोक्ता.

०२. हे म्हणणे खरे नाही की, दि. १८.०७.२०१४ रोजी मी शेतामध्ये काम करत असताना फिर्यादीच्या शेतात आरोपी आले व त्यांनी फिर्यादीसोबत वाद घालू लागले व आरोपी निवृत्ती हा फिर्यादीस हिच्या गांडीत मिरची टाका, तसेच तीला खाली पाडु मी तीला झवतो अशा अश्लील भाषेत शिवीगाळ केली व त्यांनी तिला खाली पाडून लाथाबुक्क्यांनी

मारहाण केली व मी त्यांना सोडवायला गेलो. माझ्या जबाबातील अधोरेखांकित भाग 'अ' मी पोलीसांना सांगितला नव्हता. तो माझ्या जबाबात कसा आला हे मी सांगू शकत नाही. म्हणणे खरे नाही की, माझी आरोपी ओळखीचे असल्याने त्यांना वाचविण्यासाठी मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपासणी**
**आरोपीकरिता श्री. आर. एन. खेडकर, वकील**

... नाकारला.

... फेर तपास ... काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत.

RAVIKIRAN VITTHAL SAPATE Digitally signed by RAVIKIRAN VITTHAL SAPATE Date: 2025.09.20 17:05:57 +0530

दिनांकः २०.०९.२०२५.

(**रविकिरण सपाटे**)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
पाथर्डी जि. अहमदनगर.